शिक्षण मंडळ कार्यालय
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-१८
क्र.- शिक्षण/खाप्राशा/३/कावि/११४/२०११
दिनांक :- १९/०३/२०११

**प्रति,**

**मुख्याध्यापक,**
**श्री रंगदासस्वामी शिक्षण विकास मंडळ संचलितं**
**प्राथमिक विद्यामंदिर,**
**गणेशनगर,धावडेवस्ती, भोसरी**
**पुणे ४११ ०३९**

**विषयः- नैसर्गिक वाढीचे इ. २ री ते ४थी च्या वर्गास सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षात कायम विना अनुदानित तत्त्वावर मंजूरी देणेबाबत..**

**संदर्भ:-** १) शासन निर्णय क्रं. व्हीएलएस/१००२/(१०००/०२)/प्राशि-३, दि:- १४/०१/०३

२) आपणांकडील या कार्यालयास प्राप्त प्रस्ताव.

**आदेश,**

संदर्भाकिंत पत्रास अनुसरुन आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमूद इयत्तेच्या नैसर्गिक वाढीचे वर्गांना खाली दर्शविण्यात आलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| क्रं. | शाळेचे नांव व पत्ता | माध्यम | तुकडी वाढ प्रकार | कायम विना अनुदानित तत्वावर |
|---|---|---|---|---|
| १ | श्री रंगदासस्वामी शिक्षण विकास मंडळ संचलित प्राथमिक विद्यामंदिर, गणेशनगर,धावडेवस्ती, भोसरी पुणे ४११ ०३९ | मराठी | नैसर्गिक | इ. २री ते ४थी चा वर्गास सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षात मंजूर. |

शाळेने सदरचे वर्ग/तुकडया मंजूरीसाठी खाली नमूद केलेल्या अटीची पूर्तता करणे आवश्यक आहे.

**<u>अटी व शर्ती :-</u>**

१) शाळेत शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या वेतनश्रेण्या व सेवा शर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे (एचएससी डी.एड/एसएससी डी.एड.)
२) सदर शाळेंने तुकडयासाठी सर्व भौतिक, शैक्षणिक व व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन द्यावयास पाहिजे.
३) सदर शाळेंने स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली केलेली असावी.
४) शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमाची अमंलबजावणी केली पाहिजे.
५) सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेतील पदावर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
६) सदर शाळेच्या वर्ग/तुकडीमध्ये विद्यार्थी संख्या नियमबाहय निदर्शनास आल्यास तुकडी/वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.
७) आग प्रतिबंधक सुविधांची व्यवस्था करण्यात यावी.

**प्रशासन अधिकारी**
शिक्षण मंडळ
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे-१८.

प्रतः- १) माहितीसाठी- मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-०१.

२) अध्यक्ष/सचिव,